दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १८७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१७ फेब्रुवारी २०२५




## थोडक्यात

### कर्नाळा किल्ल्यावर पर्यटकाचा मृत्यू...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, पनवेल :** ट्रेकिंगसाठी कर्नाळा किल्यावर शनिवारी सकाळी पर्यटनासाठी आलेल्या व्यक्तीला प्राण गमावण्याची वेळ आली आहे. मृत व्यक्तीचे नाव संदीप गोपाळ पुरोहित असे आहे. मधमाशांनी केलेल्या हल्यामुळे पर्यटकांची धावपळ उडाली यामध्ये संदीप यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे पोलीसांनी सांगितले. मधमाशांच्या हल्यात अजून पाचजण जखमी असून त्यांची प्रकृती बरी असल्याची माहिती पोलीसांनी दिली.

शनिवारी सकाळी सुट्टी असल्याने शेकडो पर्यटक कर्नाळा किल्यावर आले होते. यामध्ये मुंबई येथील व्हीजेटीआय महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांचा मोठा समुह होता. त्याचसोबत काही पालक आपल्या मुलांना कर्नाळा किल्यावर पर्यटनासाठी घेऊन आले होते. ४० ते ५० पर्यटकांचा गोंधळ झाल्यामुळे मधमाशा भडकल्याने त्यांनी अनेकांना दंश केले. या घटनेची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांना समजल्यावर त्यांनी तातडीने पोलीस उपनिरीक्षक विष्णू टोने यांच्यासह तेथे पोलीस पथक रवाना केले. या दरम्यान जखमींनी रुग्णवाहिकेसाठी १०८ वर संपर्क साधल्याने जखमींना वेळीच मदत मिळाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगीतले.

### विहिरीचे पाणी वाटपाच्या वादातून शेतकऱ्याचा खून

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील आंबळे येथील जगताप वस्तीवर शेतातील विहिरीच्या पाण्याच्या पाळीवरून वाद होवून एका शेतकऱ्याचा चाकूने वार करून खून केल्याची घटना घडली. या घटनेत अविनाश मल्हारी जगताप यांचा खून झाला आरोपी बाळूदास काळूराम जगताप (वय ५५, रा. आंबळे. ता पुरंदर,जि.पुणे) याला जेजुरी पोलिसांनी अटक केली आहे. जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की आंबळे हद्दीतील जगताप वस्ती येथे अविनाश मल्हारी जगताप यांची शेतजमीन आहे.

त्यांचा शनिवारी (दि.१५) सकाळी नऊ वाजता शेतातील विहिरी मधील पाण्याच्या पाळीवरून आरोपी बाळूदास जगताप यांच्याबरोबर वाद झाला. यावेळी आरोपीने खिशातील चाकू काढून अविनाश जगताप यांचेवर धारदार चाकूने चार ते पाच वार केले.या हल्लयात अविनाश जगताप यांचा मृत्यू झाला . यावेळी या ठिकाणी उपस्थित उपस्थित असणारे अविनाश जगताप यांचे वडील मल्हारी जगताप,गणेश जगताप यांच्यावरही आरोपीने चाकूने वार करून दोघांना गंभीर जखमी केले. याबाबत सौरभ दत्तात्रय जगताप यांनी जेजुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच जेजुरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे,पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी, महेश पाटील,पोलीस हवालदार दशरथ बनसोडे ,विठ्ठल कदम यांनी घटनास्थळी जावून पळून जाण्याचा तयारीत असणाऱ्या आरोपीला जेरबंद केले.जेजुरी पोलिसांनी आरोपी काळूदास जगताप यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

# सावधान ! चिकन खाल्ल्याने नव्या आजाराचा धोका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नागपूर :** महाराष्ट्रात गुलियन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) च्या रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. हा दुर्मिळ आजार विषाणू किंवा बॅक्टेरियाच्या संसर्गामुळे होतो. थकवा, झिणझिण्या आणि पाय-हातांमधील कमजोरी ही प्रमुख लक्षणे आहेत. स्वच्छता, शुद्ध पाणी आणि आरोग्यदायी आहार यांच्याद्वारे जीबीएसपासून स्वतःचे संरक्षण करू शकतो. लक्षणे दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अशा अनेक सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु आता जीबीएस आजार होण्याचे नवे कारण समोर आले आहे. राज्यात जीबीएस आजाराने थैमान घातले आहे. नागपूरमध्ये ४५ वर्षांच्या एका रुग्णाचा मृत्यू झाला. यासह राज्यात जीबीएसमुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या ९ वर पोहोचली आहे. मुंबई, पुणे सोलापूर, नागपूरमध्ये जीबीएस रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. नागपुरात दोघांवर उपचार सुरू असून



त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जीबीएस आजाराबाबत मोठी माहिती दिलीय. चिकन खाल्ल्याने जीबीएसचा धोका असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. कमी शिजवलेल्या चिकनमधून जीबीएसचा धोका आहे. पोल्ट्री फार्ममधून नमुने घेतल्यानंतर त्यांची तपासणी करण्यात आली यामध्ये जीबीएसबाबत ही माहिती समोर आली आहे. जीबीएस हा आजार पाण्यामुळे झाल्याची चर्चा होती. मात्र कोंबड्यांचे मांस खाऊन झाल्याचे पुढे येत आहे. मांस कच्चे, कमी शिवजवलेले खाल्ल्याने जीबीएस होत असल्याचे समोर आले आहे. पण लगेच आता तुम्ही कोंबड्या मारण्याचे जाळून टाकण्याची गरज नाही असेही अजित पवार म्हणाले.

**ही काळजी घेणे आवश्यक!**

नागरिकांनी मांस खाताना ते शिजवून खावे. या भागातील कोंबड्या मारू किंवा जाळून टाकू नका. हा आजार अधिक वाढू नये, यासाठी नक्की काय केले पाहिजे, कोणत्या उपाययोजना करण्याची गरज आहे, याबाबत मार्गदर्शन करणारी माहिती नागरिकांना द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कोंबड्यांचे मांस खाल्याने हा आजार होत असला तरी कोंबड्यांना मारून टाकण्याची किंवा जाळून टाकणे असे करणे आवश्यक नाही. नागरिकांनी कच्चे मांस न खाता ते चांगल्या प्रकारचे शिजवून मगच खावे, असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. या आजाराच्या रुग्णांची संख्या कमी होत असल्याचे चित्र असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेतली पाहिजे. पाणी देखील उकळून आणि गार करून प्यावे. हा आजार होऊ नये यासाठी नक्की काय केले पाहिजे, याबाबत जनजागृती करण्यासाठी आवश्यक त्या सूचना विभागीय आयुक्तांना देण्यात आल्या आहेत.

# २२ मार्चपासून रंगणार आयपीएल २०२५ चा थरार...

आयपीएल २०२५ चे वेळापत्रक १६ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आले आहे. चाहत्यांची प्रतीक्षा संपली आहे. ही स्पर्धा २२ मार्चपासून सुरू होत आहे. ही स्पर्धा १३ ठिकाणी खेळवली जाईल. पहिला सामना केकेआर आणि आरसीबी यांच्यात खेळला जाईल. हा सामना कोलकाता येथे खेळला जाईल. याशिवाय, दुसरा सामना राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाणार आहे. त्याचबरोबर ५ वेळचे विजेते चेन्नई सुपर आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना २३ मार्च रोजी खेळला जाईल. दोन्ही संघांचे चाहते प्रचंड आहेत. स्पर्धेचा अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे खेळला जाईल. या स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जातील.

२३ मार्च रोजी पहिला सामना एसआरएच आणि आरआर यांच्यात खेळला जाईल. यानंतर, दुसरा सामना चेन्नई आणि मुंबई यांच्यात संध्याकाळी ७:३० वाजता खेळला जाईल. या हंगामात लीग टप्प्यात सीएसके आणि चेन्नई दोनदा आमनेसामने येतील.

त्याच वेळी, ७ एप्रिल रोजी आरसीबी आणि मुंबई यांच्यात फक्त एकच लीग सामना खेळला जाईल. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. आयपीएल २०२५ चा अंतिम सामना २५ मे रोजी खेळला जाईल. सुरुवातीचे आणि अंतिम सामने दोन्ही कोलकात्यातील ईडन गार्डन्स येथे होतील.

**स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जाणार –**

ही जगप्रसिद्ध लीग १३ शहरात आयोजित केली जाईल. आयपीएल २०२५ मध्ये ६५ दिवसांत एकूण ७४ सामने खेळवले जातील. आयपीएल २०२५ मध्ये, लीग सामने २२ मार्च ते १८ मे दरम्यान खेळवले जातील. यानंतर, २०, २१, २३ आणि २५ मे रोजी प्लेऑफ सामने आयोजित केले जातील आयपीएल २०२५ मध्येही गेल्या वर्षीप्रमाणेच फॉरमॅट आहे. या दोन महिन्यांच्या स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज, मुंबई इंडियन्स, कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, सनरायझर्स हैदराबाद, गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स, पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स हे १० आयपीएल संघ विजेतेपद जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील.

**आयपीएल २०२५ स्पर्धेचे स्वरूप –**

आयपीएल २०२४ प्रमाणेच फॉरमॅट आहे. त्यानुसार १० संघांची दोन गटात विभागणी केली आहे. प्रत्येक संघ लीग टप्प्यात १४ सामने खेळेल. पॉइंट टेबलमधील अव्वल दोन संघ पहिल्या क्वालिफायरमध्ये भिडतील, तर तिसऱ्या



आणि चौथ्या क्रमांकाच्या संघांमध्ये एलिमिनेटर सामना खेळला जाईल. पहिल्या क्वालिफायरमध्ये पराभूत संघ आणि एलिमिनेटरमध्ये जिंकणारा संघ दुसऱ्या क्वालिफायरमध्ये भिडेल. येथील विजेता संघ पहिल्या क्वालिफायरमधील विजेत्या संघाविरुद्ध अंतिम फेरीत पोहोचेल.

**२ संघांच्या कर्णधाराची घोषणा**

**अद्याप बाकी –** लखनौ सुपर जायंट्स, पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने अलीकडेच त्यांचे कर्णधार जाहीर केले. २७ कोटी रुपयांना करारबद्ध झालेला ऋषभ पंत सुपर जायंट्सचे नेतृत्व करेल तर २६.७५ कोटी रुपयांना निवडलेला श्रेयस अय्यर किंग्जचे नेतृत्व करेल. आरसीबीने रजत पाटीदारला त्यांचा नवीन कर्णधार म्हणून घोषित केले. फक्त दोन संघ दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांनी अद्याप आयपीएल २०२५ साठी त्यांच्या कर्णधाराची घोषणा केलेली नाही.

# टाकळी ढोकेश्वर येथिल १०० वर्षांची कावड यात्रेची परंपरा आजही कायम !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** फेब्रुवारी महिन्यातील माघ पौर्णिमेला टाकळी ढोकेश्वर येथे दरवर्षी प्रमाणे कावड यात्रा उत्साहात पार पडली. या गावचं अध्यात्मिक महत्व आणि अध्यात्मिक माहितीही तितकीच मोठी आहे. या गावचं ग्रामदैवत असणाऱ्या ढोकेश्वर मुळे टाकळी ढोकेश्वरचं हे अध्यात्मिक महत्व आहे. त्यामुळेच टाकळीचं दुसरं नाव आणि ओळखही टाकळी ढोकेश्वर अशी आहे. टाकळी गावच्या मध्यात वसलेल्या बिरोबा मंदिराने टाकळी ढोकेश्वरचं अध्यात्मिक विश्व अतिशय समृद्ध केलं.

माघ (नव्याची) पौर्णिमा टाकळीत होणारी बिरोबाच्या कावड यात्रेचं महत्त्व टाकळीकरांसाठी अतिशय महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी असलेल्या टाकळी ढोकेश्वर येथील प्रसिद्ध कावड यात्रेला १०० वर्षांची परंपरा आहे. फेब्रुवारी महिन्यातील माघ पौर्णिमेला बिरोबा कावड पालखी

> १९६० साली या मंडळाने पुणतांबा येथिल गोदावरी नदीचे पाणी आणून जलाभिषेक केला. त्याच्या पुढील वर्षी पायी जात भोपळ्याच्या कावडीतून प्रवरासंगम येथून गोदावरी नदीचे पाणी आणले आणि त्याचा जलाभिषेक केला. जुन्या काळचे नानाभाऊ तराळ, धोंडीबा (बाबा) रांधवण, बबन तराळ, शंकर धुमाळ, रामदास झावरे यांनी आपल्या साथीदारांसह दरवर्षी जलाभिषेक करण्याची परंपरा सुरू केली असून परंपरा कायम यापुढील काळात सुरू राहणार आहे.
>
> **– संपत तराळ, बिरोबा कावड मंडळाचे मार्गदर्शक**

उत्सव साजरा करण्यात आला. टाकळी ढोकेश्वर कावड उत्सव महादेवाच्या जयघोषात साकुरच्या बिरोबाचे चांगभले कावडधारी मंडळासह युवकांनी ही जलाभिषेक केला. पालखी – कावड उत्सव पहाण्यासाठी परिसरात मोठी गर्दी झाली होती.



टाकळी ढोकेश्वर कावड पालखी उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा झाला. कावड पालखी मिरवणूकीत गावातील शेकडो शिवभक्त ग्रामस्थांनी सहभाग घेतला.

ढोल – ताशांच्या गजरात आणि महादेवाच्या जयघोषात बिरोबा मंदिरात जाऊन प्रदक्षिणा घालून जलाभिषेक करत दर्शन घेत होते. बिरोबा हे टाकळी ढोकेश्वरचे जागृत देवस्थान आहे. गोदावरी नदीच्या काठावर वसलेले पुणतांबा (ता. कोपरगाव) चांगदेव महाराज समाधी स्थळ येथे गोदावरी नदीच्या पाण्याचा अभिषेक पूर्वापार पद्धतीने घातला जातो. गोदावरी नदीला परिसरात गंगेतकेच महत्त्व आहे. अलीकडच्या काळात गोदावरी नदीचे पाणी कावडीतून अनवाणी पायाने आणण्याची एक परंपरा सुरू झाली. आता कावड यात्रा ही टाकळी ढोकेश्वर गावाची ओळख बनली आहे.

अक्षराज

# संपादकीय



## भारतीय क्रांतिकारककांचे गुरू

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात लहुजींचे पूर्वज पराक्रम गाजवीत. साळवे घराणे सशस्त्र विद्येमध्ये निपुण व तरबेज होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात लहूजींच्या पूर्वजांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात साळवे घराण्याची योग्यता ओळखून पुरंदर किल्ल्याच्या सरंक्षणाची जबाबदारी लहुजी साळवे यांच्या आजोबांकडे सोपवली होती. पुरंदर किल्ल्याच्या सरंक्षणासाठी साळवे घराण्यातील अनेक वीरपुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरींमुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी लहुजींच्या पूर्वजांना राऊत या पदवीने गौरविले होते.

वस्ताद लहुजी राघोजी साळवे हे खरेतर लहुजी वस्ताद नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावातील एका कुटुंबात झाला. मातंग समाजात जन्माला आलेल्या लहूजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील वीर पुरुषांकडून मिळाले होते. लहूजींच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. लहूजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे अतिशय पराकर्मी पुरुष होते. युद्ध कलेमध्ये त्यांचा कोणीही हात धरू शकत नसे. वाघाबरोबर लढाई करण्याच्या पराक्रमामुळे लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे त्याकाळी प्रसिद्ध होते. एकदा त्यांनी वाघाबरोबर युद्ध केले आणि जिवंत वाघाला खांद्यावर घेऊन पेशव्यांच्या राजदरबारी सादर केले होते. असे त्यांनी आपल्या प्रचंड शक्तीचे प्रदर्शन केले होते.

पुढे दि.५ नोव्हेंबर १८१७ला पेशव्यांचे इंग्रजांसोबत खडकी येथे तुंबळ युद्ध झाले. तब्बल १२ दिवसांपर्यंत राघोजी व २३ वर्षे वयाच्या लहुजी यांनी आपल्या मावळ्यांना सोबत घेऊन इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. लहुजींचे वडील राघोजी साळवे वाऱ्याच्या वेगाप्रमाणे शत्रूवर तुटून पडले होते. ते तलवारीचे सपासप वार करत शत्रुंना जमिनीवर लोळवत होते. अखेर या संकटातून बाहेर पडण्यासाठी घाबरलेल्या इंग्रजांनी एकत्रित वार करून राघोजींना धारातीर्थी पाडले. राघोजी या युद्धात इंग्रजांच्या हातून लहुजींच्या समोरच शहीद झाले. त्यावेळी पेशव्यांचा पराभव झाला. पुढे इ.स.१८१८मध्ये मराठा साम्राज्याचा भगवा ध्वज शनिवारवाड्यावरून हटवून तेथे इंग्रजांचा युनियन जॅक फडकला. या पराभवाने लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली. स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ती, देशप्रेम यांनी झपाटलेले लहुजी आपल्या वडिलांच्या मृत्यूच्या दुःखातून सावरले. आपल्या वडिलांना आपल्या डोळ्या देखतच शहीद झालेले पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहूजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठी अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी आपल्या वडिलांची समाधी उभारली. ही समाधी अजूनही पुणे-शिवाजी नगरजवळच्या वाकडेवाडी येथे आहे.

क्रांतिगुरू लहुजी हे दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदूक चालवणे व निशाणेबाजी अशा सर्व युद्धकला कौशल्यांमध्ये निपुण होते. त्यांचे पिळदार शरीर व उभरलेली छाती पाहून शत्रूला सुद्धा घाम फुटत असे. जीवघेण्या शस्त्रांबरोबर ते अगदी एखाद्या खेळण्याप्रमाणे खेळत असत. आपल्या वडिलांचा मृत्यू व इंग्रजांनी केलेला पराभव त्यांना असह्य झाला. पराक्रमी घराण्यातील लहुजींनी इंग्रजांवर मात करण्यासाठी म्हणजे पर्यायाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी मवाळपंथी नव्हे तर जहाल क्रांतिकारक निर्माण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपल्या अंगी असलेले युद्धकलेचे शिक्षण तरुणांना देण्याचे ठरविले. म्हणून त्यांनी इ.स.१८२२मध्ये पुण्यातील रास्ता पेठ येथे देशातील पहिले युद्ध कलाकौशल्य तालीमकेंद्र उघडले. ते नाना रास्ते सरदार यांच्या हस्ते सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्वच समाजांतील युवक तालीम घेण्यासाठी येऊ लागले. यात प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहाद्दूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, महात्मा जोतीराव फुलेंचे सहकारी वाळवेकर आणि परांजपे हे देखील लहुजी साळवे यांच्या आखाड्यातच शिकले. इ.स.१८४८ साली लहुजींच्या याच तालमीत सावित्रीमाई फुले यांची पहिली मुलींची शाळा सुरू झाली होती. म्हणून ते आद्य महाक्रांतिगुरू ठरतात, यात मुळीच शंका नाही.

# शासकीय शिवजयंती तिथीनुसार साजरी व्हावी !




भारतीय संस्कृतीत वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार म्हणजेच तिथीनुसार साजरे करण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आजही अनेक घरांत पिढ्यानपिढ्या ही प्रथा जपली जात आहे. बदललेली शिक्षणपद्धती, इंग्रजी भाषेला दिले गेलेले अवास्तव महत्व, तरुणवर्गावर पाश्च्यात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव आणि त्याअनुषंगाने बदलत गेलेले राहणीमान यांमुळे दैनंदिन जीवनात तिथीचा वापर करणे हळूहळू कमी होत गेले. आजमितीला तिथीचा उल्लेख केवळ लग्नपत्रिकांवरच पाहायला मिळतो. या भारतभूमीत होऊन गेलेले देवतांचे अवतार, संत महात्मे यांचे प्रकटदिन, जयंती आणि पुण्यतिथी हे आजही तिथीनुसारच साजरे केले जातात, मकर संक्रांत वगळता हिंदू धर्मातील समस्त सण-उत्सवही तिथीवरच आधारित आहेत. या महाराष्ट्रभूमीत जन्माला येऊन साऱ्या विश्वाला आदर्श राज्यकारभाराचा गुरु मंत्र देणारे, आपल्या अतुल पराक्रमाने, अचाट बुद्धिचातुर्याने, कुशल रणकौशल्याने आणि प्रबळ इच्छाशक्तीने शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील जनतेसाठी अवताराहून कमी नाहीत त्यामुळे त्यांचा जन्मदिन तिथीनुसारच साजरा व्हावा यासाठी अनेक संघटना, संस्था आणि इतिहासप्रेमी आग्रही आहेत. समाज ऐक्यासाठी आणि लोकजागरणासाठी लोकमान्य टिळकांनी शिवजयंती सुरु केली तीही तिथीनुसारच. मात्र त्या काळापासून छत्रपती शिवरायांच्या जन्मतिथीबाबत बराच घोळ आहे. शिवरायांची जन्मतिथी इतिहासकालीन अनेक पुराव्यांमध्ये वेगवेगळी असल्याचे दिसून येते. शिवरायांच्या जन्मतिथीचा हा वाद १०० वर्षांहून अधिक काळ सुरु होता अखेर महाराष्ट्र शासनाने शिवजयंतीची तारीख निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन केली. २००१ साली या समितीने इतिहासकालीन दस्तावेज आणि इतिहासतज्ञांचे मत विचारात घेऊन शिवाजी महाराजांची जयंती म्हणून फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० या तारखेवर शिक्कामोर्तब केले. या तारखेबाबतही एक घोळ झाला आहे. फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला अनुसरून निश्चित केलेली १९ फेब्रुवारी ही तारिख ज्युलियन कॅलेंडरनुसार आहे. ज्युलियन कॅलेंडर आता कालबाह्य झाले असून सध्याची इंग्रजी कालगणना ही ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार प्रचलित आहे. ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला १ मार्च १६३० ही इंग्रजी तारीख येते. १९ फेब्रुवारी ही तारिख राज्यशासनाने गठीत केलेल्या समितीने निश्चित केल्यामुळे सध्या शासकीय शिवजयंती १९ फेब्रुवारीलाच साजरी केली जाते.

शासनाने जरी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी करण्याचे निश्चित केले असले, तरी राज्यातील बहुतांश भागात आजही शिवजयंती तिथीनुसार साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराज भारतातील असे एकमेव राजे असावेत ज्यांची जयंती दरवर्षी इंग्रजी तारखेप्रमाणे आणि हिंदू कालगणनेनुसार तितक्याच जल्लोषात साजरी केली जाते. ज्या शिवरायांनी आपले अखंड आयुष्य हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी वेचले त्यांची जयंती ख्रिस्ती कालगणनेनुसार साजरी व्हावी हे खरेतर मनाला खटकणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना परकीय कालगणना झिडकारून ''राज्याभिषेक शक'' ही स्वकीय कालगणना चालू केली. परकीय चलनाचा वापर थांबवून स्वकीय चलनाची निर्मिती केली. इतकेच नव्हे, तर परकीय भाषा, संस्कृती, आणि तिची प्रतिके झुगारून स्वकीय भाषेत राज्यकारभार केला, स्वसंस्कृतीचे रक्षण केले. मराठी भाषेच्या शुद्धीकरणासाठी शिवरायांनी केलेल्या प्रयत्नांची इतिहासात सविस्तर नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्यक्ष देव किंवा अवतार नसले, तरी त्यांच्यामुळे हिंदूंच्या मंदिरातील देव शाबूत राहिले, त्यामुळे हिंदूंना ते देवाच्या स्थानी आहेत. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दाखवलेले अफाट शौर्य हे अवतारी कार्याहून कमी नाही, त्यामुळे हिंदूंना ते रामकृष्णादी अवतारांप्रमाणेच पूजनीय आहेत. शिवजयंती देव, अवतार आणि संत यांच्याप्रमाणे तिथीनुसार म्हणजेच फाल्गुन वद्य तृतियेला साजरी केली जावी ही मागणी गेली अनेक वर्षे शिवप्रेमींकडून लावून धरली जात आहे. आजमितीला शिवजयंती केवळ राज्याच्या सीमेपुरती मर्यादित राहिलेली नाही. साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी नागरिक बहुसंख्येने आहेत त्या ठिकाणी शिवजयंती जल्लोषात साजरी केली जाते त्यामुळे ती इंग्रजी तारखेनुसार साजरी व्हायला हवी असे मत राज्याने गठीत केलेल्या समितीतील काही सदस्यांनी व्यक्त केले होते. खरेतर केवळ शिवजयंतीच नव्हे तर गणेशोत्सव, दिवाळी, होळी यांसारखे सण आणि उत्सव भारतीय नागरिक ज्या ज्या देशांत आहेत त्या त्या ठिकाणी प्रतिवर्षी उत्साहाने साजरे केले जातात. हे सारे सण तिथीनुसार साजरे होऊ शकतात मग शिवजयंतीच्या बाबतीत इंग्रजी तारखेचा अट्टाहास संयुक्तिक वाटत नाही. आज राज्यावर शिवसेना आणि भाजप या शिवप्रेमी आणि हिंदुत्ववादी पक्षांचे शासन आहे. शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षाच्या शाखाशाखांतून शिवजयंती उत्सव हे तिथीनुसारच साजरे करण्यात आले आणि यापुढेही ते तिथीप्रमाणेच साजरे केले जातील यात शंका नाही. याआधीही भाजपसोबत सत्तेत असताना शिवजयंती तिथीप्रमाणे साजरी करण्याचा आग्रह शिवसेनेने धरला होता. शिवप्रेमींच्या मागणीखातर गड किल्यांवरील अतिक्रमणाच्या विरोधात कठोर भूमिका घेणाऱ्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवप्रेमींची अनेक वर्षे प्रलंबित असलेली ही मागाणीसुद्धा पूर्ण करावी.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते.

लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले.

लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले.

१७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगम पूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४९२९५**

## राजस..

एकेक बातमी ऐकून
उरात धडकते धस्स
अस्फुट शब्द उच्चारे
आता नौटक्या बस्स

निकृष्टवापरे बियाणे
जमिनी असो सकस
माझे स्थान बळकट
प्रत्येकां एकचं हवस

श्रध्दाकरी अंधत्वाने
दगडाला बोले नवस
तिकडे तपास रेंगाळे
ढकलत रहावेदिवस

बेधुंद करी भल्यांना
अफवा नामक चरस
एकमेकांना हरवाया
जोरात चालते चुरस

बदलत राही स्वभाव
उगाचच होतो विरस
सत्तेची नशा भयानक
फिक्का पडे सोमरस

अंतर्मना शुध्दी करण
कुठून आणावे पायस
अपूर्ण मृताची इच्छा
पिंडा शिवेना वायस

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## वाचक पत्र



### 'लव्ह जिहाद'विरोधी कायद्याचे स्वागत !

राज्यात लवकरच लव्ह जिहादवरोधी कायदा करण्याचे सूतोवाच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. देशभरातील ८ राज्यांत हा कायदा याआधीच लागू करण्यात आला आहे. तथाकथित शांतीप्रिय समाजातील तरुणांकडून हिंदू मुलींना फूस लावून त्यांचे धर्मांतर केले जाते, त्यांचा उपभोग घेऊन मुले जन्माला घातली जातात. नंतर त्यांना वाऱ्यावर सोडले जाते अथवा आखाती देशांत त्यांची विक्री केली जाते. या सर्वांना विरोध करणाऱ्या मुलींची हत्या केली जाते. त्यांची प्रेते रस्त्यालगत गोण्यांमध्ये, सूटकेसमध्ये अथवा फ्रिजमध्ये भरली जातात. एकामागोमाग अशी अनेक प्रकरणे उघडकीस आल्याने अनेक हिंदुत्ववादी संघटना याविरोधात जागृत झाल्या. या सर्वांमागे मोठे षडयंत्र कार्यरत असून हिंदु मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवण्यासाठी या समाजातील तरुणांना बाईक, पैसे, महागड्या वस्तू पुरवण्यासाठी अर्थसहाय्य मिळते हेही चौकशीतून सिद्ध झाले आहे. हे षडयंत्र संपूर्ण देशभरात कार्यान्वित असून समाजाचे संख्याबळ वाढवणे. हिंदूंचा वंशविच्छेद करणे हाच उद्देश या षडयंत्रामागे असल्याचेही उघड झाले आहे. हिंदूंच्या मुळावर उठलेल्या या षडयंत्राविरोधात कायदा व्हावा यासाठी राज्यातील अनेक संघटना मागील काही वर्षांपासून आंदोलने करत आहेत, शासनदरबारी निवेदने आहेत. या संघटनांच्या लढ्याला अखेर यश येण्याची चिन्हे दिसून येत असून लवकरच लव्ह जिहादविरोधी कायदा महाराष्ट्रातही लागू होणार असल्याने हिंदूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिलांचा दोन विजयाने बाद फेरीत प्रवेश



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६ :** महाराष्ट्राच्या महिला संघाने ७१व्या महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत साखळीत सलग दोन विजय मिळवित आरामात बाद फेरी गाठली. हरियाणा, मोरमाजरा, कर्नाल येथील आर्य कन्या गुरुकुलच्या मैदानात मॅटवर झालेल्या क गटात महाराष्ट्राच्या महिलांनी आज शेवटच्या साखळी सामन्यात छत्तीसगडचा ४९-३१ असा पाडाव केला. आक्रमक सुरुवात करीत विश्रांतीला २९-१४ अशी आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर त्याच जोशात खेळ करीत १८ गुणांच्या फरकाने सामना जिंकला. आम्रपाली गलांडे, मंदिरा कोमकर, पूजा यादव यांच्या चढाईच्या आक्रमक खेळाने महाराष्ट्राने हा विजय साजरा केला. महाराष्ट्राचा बचाव या सामन्यात थोडा कमजोर पडला. गतवर्षी महाराष्ट्राच्या महिलांनी उपांत्य फेरी गाठत तृतीय क्रमांक पटकाविला होता. यावेळी महाराष्ट्राचा क गटात समावेश होता . ओडिसा, छत्तीसगड हे दोन महाराष्ट्राच्या गटात होते. या गटात महाराष्ट्र अव्वल ठरला. रात्री उशिरा झालेल्या पहिल्या साखळी सामन्यात महाराष्ट्राने यजमान ओडिसाचा ६२-१८ असा धुव्वा उडवीत बाद फेरी गाठण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. ओडिसाने आपल्या पहिल्याच चढाईत दोन गडी टिपत सनसनाटी निर्माण केली. पण त्यातून सावरत महाराष्ट्राने लोण देत आघाडी घेतली. पहिली ५ ते ७ मिनिटे ओडिसाने महाराष्ट्राला कडवी लढत दिली. पण पूर्वार्धात दोन लोण देत २७-१४ अशी भक्कम आघाडी घेतली. महाराष्ट्राने शेवटच्या ५ मिनिटात २लोण देत गुणांचे अर्धशतक पार केले. महाराष्ट्राने या सामन्यात एकूण ६ लोण देत सामना एकतर्फी केला. आम्रपाली गलांडे, मंदिरा कोमकर, ज्युली मिस्किटा, समरीन बुरोंडकर यांच्या चढाई पकडीच्या खेळाने महाराष्ट्राने ४४ गुणांच्या मोठ्या फरकाने सामना जिंकला.

### महेश ढेबे यांची मंत्रालयात महसूल सहाय्यक पदी निवड निवड



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१६, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथील महेश लक्ष्मी दत्तात्रय ढेबे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन मुंबई येथे महाराष्ट्र राज्याच्या मंत्रालयामध्ये महसूल सहाय्यक पदी निवड. क्षेत्र महाबळेश्वर येथील तांदुळन्ही येथे राहणारा महेश याने क्षेत्र महाबळेश्वर येथील जि.प च्या प्राथमिक शाळेत १ली ते ४थी चे शिक्षण पूर्ण करुन महाबळेश्वर येथील नगरपालिका संचालित गिरिस्थान प्रशालेत आपले ५वी ते १०वी व नंतर पदवी चे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर मेढा येथील जावली करिअर ॲकॅडमीचे संस्थापक संतोष कदम व राजश्री कदम यांचे स्पर्धा परिक्षासाठी बहुमोलाचे मार्गदर्शन लाभले. घरची परिस्थिती बेताची असताना आपल्या जिद्दीने त्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य मंत्रालयामध्ये महसूल सहाय्यक पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन जाज्वल यश प्राप्ती करून आपल्या आई वडिलांच्या कष्टाचं सोनं केलं. वडिल टॅक्सी ड्रायव्हर तर आई येथील रामसुख हॉटेलमध्ये काम करुन महेश याला मोठे केले. त्याचे यश पाहून शहरातून सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.

### शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त शहापूरमध्ये बाईक रॅलीचे आयोजन संपन्न



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१६, शहापूर (ठाणे) :** सालाबादप्रमाणे यंदा देखील शिवजयंती उत्सव समितीतर्फे शहापूरमध्ये तीन दिवसीय शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीचे मुख्य आकर्षक म्हणजे मंगळवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी महिलांसाठी अनोखी अशी 'हिरकणी स्पर्धा' होणार असून यामधे महिलांना कृत्रिमरित्या बनवलेल्या कड्यावर चढुन जायचे आहे. तर बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी संतोष शिंदे व रजनी शिंदे यांच्या हस्ते शिवप्रतिमेला दुग्धाभिषेक करुन पुजन करण्यात येत आहे. शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्ताने रविवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० वाजता खालचा नाका येथील प्रवेशद्वारा पासुन या बाईक रॅलीला सुरवात झाली, मिरची गल्ली, कासार आळी, ब्राह्मण आळी, देवीचे मंदिर, रिद्धी सिद्धी नगर या मार्गाने पुन्हा प्रवेश द्वार येथे बाईक रॅलीची सांगता करण्यात आली.या वळी शिवजयंती उत्सव समितीचे संतोष शिंदे, आमदार दौलत दरोडा डॉ.अजित पोद्दार, आदी पदाधिकाऱ्यांनी शिवतीर्थ येथील शिवप्रतिमेला अभिवादन केले. या बाईक रॅलीमध्ये अनेक महिला, पुरुष, तरूण, तरूणी सामील झाले होते. यावेळी जय भवानी जय शिवाजी... अशा विविध घोषणा देत छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला.

### आंजर्ले येथे १९ फेब्रुवारीला रंगणार स्वामीच्या पालखीचा सोहळा

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.१६, दापोली (रत्नागिरी) :** अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांचा पालखी सोहळा यंदा आंजर्लेकराना १९ फेब्रुवारी २०२५ रोजी अनुभवता येणार असून स्वामी पालखीचे स्वागतासाठी स्वामी भक्त आंजर्लेवासियानी मोठी तयारी केलेली दिसत आहे. दापोली तालुक्यात श्री स्वामी समर्थांची भक्त मंडळी मोठ्या प्रमाणात आहे. अनेक भक्त स्वामी दर्शनासाठी अक्कलकोट येथे नित्य जाऊन स्वामी चरणी आपली सेवा अर्पित करत असतात. मात्र अनेकांना वैयक्तिक अडचणीमुळे, वयोमानामुळे दूरवरच्या प्रवासामुळे स्वामी सेवेला मुकावे लागते. मात्र स्वामी पालखी दापोली तालुक्यात येण्यास सुरुवात झाल्यानंतर भक्तांची ही अडचण दूर झाली आहे. दरम्यान आंजर्ले पंचक्रोशीत ही स्वामी भक्तांची संख्या मोठी असून गेली ३ वर्षे स्वामी पालखी गावात येत असल्यामुळे येथील भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही आंजर्ले येथील रवींद्र अनंत तोडणकर यांचे निवासस्थानी १९ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वामी पालखीचे सायंकाळी ४ वाजता आगमन होणार आहे.

# जगातील सर्वात मोठा धार्मिक उत्सव दिव्य महाकुंभमेळा...!

दिव्य महाकुंभ पर्व हे १३ जानेवारी पासून चालू झालेले आहे ते २६ फेब्रुवारी पर्यंत आहे. या आधीचे महाकुंभ पर्व काही पिढ्यांनी अनुभवले नाही व पुढील काही पिढी सुद्धा अनुभवणार नाही.१४४ वर्षांनी येणारे हे महाकुंभपर्व सनातनींसाठी गर्वाची बाब आहे. सर्व भारतातूनच नाही तर जगभरातून या पर्वासाठी जवळपास ५१ कोटी लोकांनी हजेरी लावून सुखद अनुभवघेतला आहे. आपल्या देशातील तिर्थराज पर्यागराज येथील या अभूतपूर्व सोहळ्याचा सुखद अनुभव मी ही घेण्याचे ठरवले. माझा या दिव्य सोहळ्याचा अनुभव घेण्याचा योग माघी पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी आला. त्या दृष्टिकोनातून रेल्वेने हावडा मेल या ट्रेनने प्रयागराज छिवकी स्टेशनला पोहोचलो. स्टेशन आणि रेल्वेमध्ये सुद्धा गर्दीच गर्दीहोती.भयंकर गर्दीअसून सुद्धा स्टेशनवर शिस्त व स्वच्छतेचे नियम खूप छान केले आहे . जागोजागी रेल्वे पोलीस तैनात केले आहे. मुख्य दरवाजातून बाहेर पडल्यानंतर उत्तर प्रदेश राज्य सरकारचे पोलीस शिस्त,नियम व स्वच्छते बद्दल म ार्गदर्शन करत होते. स्टेशनच्या बाहेर भव्य मंडप उभारले आहे. तेथे भाविकांसाठी काही काळ विश्रांतीसाठी व्यवस्था आहे. त्याचप्रमाणे रेल्वेचे अनारक्षित काउंटर आहे.भाविकांची गर्दी लक्षात घेता जाण्याचा आणि येण्याचा मार्ग वेगवेगळा केला आहे. तेथून मी व सहकारी मित्र मिळून एका खाजगी खोली साठी संपर्क केला. रूम बुक केल्यावर तेथे सर्वप्रथम फ्रेश झालो. तेवढ्याच रात्री या दिव्य सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी बाहेर निघालो. छिवकी स्टॉपवरून खाजगी रिक्षाने महाकुंभमेळ्याच्या ठिकाणी जाण्यास निघालो. रस्त्याच्या डिवाइडरवरील खांबावरील खूप छान अशी विद्युत रोषणाई रात्री साडेदहा वाजता सुद्धा शोभून दिसत होती. तेथून संगम घाट पाच ते किलोमीटर अंतर आहे. बांगड चौराह या ठिकाणापर्यंतचा खाजगी रिक्षातून प्रवास करताना भव्य पुलावरून जाताना हजारो विजेच्या दिव्यांनी सजलेला घाट खूप तेजस्वी व आकर्षक दिसत होता.मंद गार हवा होती. वातावरण खूपच अल्हाददायक वाटत होते. एका दिव्यशक्तीची अनुभूती येत होती. रस्त्याने भाविक हर हर महादेव , हर हर गंगे चा नामजप करत एवढ्या रात्री संगम घाटावर पायी निघाले होते. जेणेकरून दुसऱ्या दिवशी सकाळी स्नानासाठी लवकर नंबर लागेल. बांगड चौराह येथे पोहचल्यावर उजव्या बाजूला हजारो एकर जमिनीवर भाविक व यात्री करून साठी तंबू उभारले आहेत. त्याचप्रमाणे रस्त्यावर जमिनीवर सततच्या पाण्यामुळे पाय घसरणार नाही म्हणून लोखंडी पट्ट्या व त्याचप्रमाणे वाळू पसरवली आहे. त्याचबरोबर रस्त्याच्या दुतर्फा हंगामी शौचालय व स्वच्छतागृहे उभारले आहे. वापरण्यासाठी पाण्याची व्यवस्था केली आहे. स्वच्छता कर्मचारी त्यांची वेळोवेळी साफसफाई करत असतात, त्यामुळे एवढे हजारो भाविक येऊन सुद्धा कुठेच घाण दिसत नाही. स्वच्छतेचे नियोजन अगदी वाखण्याजोगे आहे. दररोज सकाळी चार ते पाच वाजताच दिवसभराची जमलेली घाण स्वच्छता कर्मचारी ट्रॅक्टर च्या साह्याने बाहेर नेऊन टाकतात.

पिण्याच्या पाण्याची पाच हजार लिटर क्षमता असलेली टँकर जवळपास दोनशे ते तीनशे मीटर अंतरावर उभे केले आहे. आर ओ मशीन सुद्धा लावले आहे. थोडेसे आत शिरल्यावर मोकळ्या मैदानात भव्य मेला भरला आहे.मोठमोठे रहाट पाळणे,खेळण्याच्या वस्तू,खाद्यपदार्थाची दुकाने आहेत त्यामध्ये फरसाण मकेचा भुट्टा आणि विशेष कुल्हड मधील प्रसिद्ध लस्सीचा स्वाद चाखता येतो.प्रतीकात्मक श्री गरुड राम मंदिर त्याचबरोबर अयोध्येच्या प्रसिद्ध राम मंदिराची प्रकृती बनवली आहे. उद्देश हाच की सर्व वयोगटातील लोकांना याचा आनंद लुटता यावा.काही इलेक्ट्रॉनिक कंपनीच्या माध्यमातून निशुल्क चार्जिंग सॉकेट बसवले आहे,जेणेकरून भाविक भक्तांचे भ्रमणध्वनीची ऊर्जाशक्ती कमी होऊन एकमेकांचा संपर्क तुटायला नको.त्या ठिकाणाला एक प्रकारचा मेला अर्थात यात्रा स्वरूप प्राप्त झालेले आहे. मध्यरात्रीसुद्धा तेथील वातावरण विद्युत रोषणाईने एवढे लखलखित दिसते की दिवस कि रात्र कळत नाही. हा नयनरम्य सोहळा बघून तेथून पाय निघत नव्हता परंतु दुसऱ्या दिवशी सकाळीच उठून त्रिवेणी संगमावर स्नान करायला यायचे होते म्हणून परत रूमवर आलो. तेथील खाजगी वाहने व उत्तर प्रदेश सरकारचे वाहने रात्रभर चालू होती, जेणेकरून भाविकांची गैरसोय होणार नाही.

सकाळी लवकर उठलो. तयारी केली छिवकी स्टॉपहून खाजगी रिक्षाने बांगड चोराह वर पोहोचल्यावर,सकाळी साडेपाच ला सुद्धा तोच उत्साह, आनंद व गर्दी दिसली. घाई घाई पायी चालत. सर्वप्रथम संगम स्थानावर स्नानासाठी जायचे ठरवले. मिनिटा- मिनिटाने भाविकांच्या गर्दीच्या लाटा ओसांडून वाहत होत्या. रस्त्याने अनेक नयनरम्य देखावे बघत बघत जवळपास साडेसहा पावणेसात पर्यंत संगम स्थानावरील स्नान घाटावर पोहोचलो. लाऊड स्पीकरने तेथील कर्मचारी सतर्कतेच्या सूचना देत होते. जागोजागी युपी पोलीस भाविकांना मार्गदर्शन करत होते. मदत करत होते. सकाळची वेळ मन अगदी प्रसन्न झाले होते.जवळपास पाच ते सहा किलोमीटर अंतर चालून सुद्धा एक विलक्षण आनंद - अनुभूती येत होती.एक भव्य संगमद्वार उभारले आहे. पूर्व दिशेकडून सूर्य तांबड्यातून सोनेरी होत चालला होता. सूर्याचे सोनेरी किरणे जसे जसे गंगामाता, यमुनामाता अन लुप्त सरस्वतीम ातेच्या पवित्र जलतिर्थावर पडत होते तसतसा संघमघाट तेजस्वी भासत होता.सोनेरी किरणांनी अभूतपूर्व दिव्यशक्तीचे दर्शन होत होते.कारण मुळातच ती भूमी साधुसंतांच्या तपश्चर्येची व समर्पणाची आहे. तिथल्या रेतीच्या कणाकणामध्ये साधुसंतांचा वास आहे.स्नानघाटावर जवळपास कमरे इतक्या पाण्यापर्यंत जाण्याची मुभा आहे. समोर संरक्षण म्हणून पाण्यावर तरंगणारे नावे सारखे […] ठोकळे बसवलेले आहे.त्यावर सुद्धा तेथील कर्मचारी तैनात आहे.जेणेकरून कुणाचा पाय वगैरे घसरून काही दुर्घटना घडायला नको. अर्थात अतिशय सुरक्षित अशी व्यवस्था भाविकांसाठी उत्तर प्रदेश सरकारने केली आहे. मी संगमास्थानावर प्रथम दुग्ध अर्पण केले. सूर्याला नमस्कार केला.पवित्र तिर्थाम ध्ये पाच डुबक्या मारल्या. माता गंगा,लुप्त सरस्वती व यमुना मातेला नमस्कार करून प्रार्थना केली.



संगम स्थानाहून स्नान करून बाहेर आल्यावर सकारात्मक व दिव्य शक्तीचा अनुभूती आली.अफाट गर्दीतून थोडेसे बाहेर आल्यावर तेथील व्यवसायिक संपूर्ण कपाळभर पिवळ्या अष्टगंधावर कुंकू ने राम, महाकाल,राधे-राधे वगैरे काढतात. मी सुद्धा तो कपाळभर गंध लावला .त्यानंतर तेथील नयनरम्य दृश्य व कला बघत बघत रस्त्याने परतीच्या मार्गावर निघालो. जागो जागी रुद्राक्षांच्या माळा,महादेवांची पिंड, गंध, अष्टगंध पितळीच्या पूजेच्या वस्तूंची दुकाने थाटलेली होती. खाद्यपदार्थांचे दुकाने त्यात तेथील छोले-भटूरे, समोसे,कचोरी आलू सब्जी, पुरी,जलेबी, लाडू पोहे वगैरे सुद्धा होते. पेय पदार्था पैकी लस्सी, दूध, चहा वगैरे विशेषतःकुल्हड मधील म्हणजेच मातीच्या ग्लासातील गरम गरम चहाचा एक आगळा- वेगळा सुगंध यायचा. लस्सी, दूध,ताक वगैरे बरेच काही पदार्थाचे हात ठेले आहेत. तेथे काही अपंग व्यक्ती दिसल्या. लोक त्यांना मनोभावे दान करायचे.कुणी भजन कीर्तन करायचे.तेथे डिजिटल कुंभमेळा व समुद्र मंथनाचा आकर्षक सेटअप उभारला आहे. पोटा-पाण्यासाठी डोंबाऱ्याचा खेळ करणारी मुलगी व आई हातामध्ये ढोलक वाजवणारी आई दिसली हे दृश्य बघून मन हेलावून गेले.अफाट गर्दीमुळे कुणी एकमेकांपासून हरवल्यास कम्प्युटरिकृत खोया-पाया केंद्र आहे.हरवलेल्या व्यक्ती व शोधणाऱ्या व्यक्तीचे संपूर्ण तपशील घेऊन लाऊड स्पीकर मध्ये पुकारने चालू असते. हरवलेला व्यक्ती साधारण एक तासाच्या आत सापडतोच, अशी सुंदर व्यवस्था तिथे केली आहे. काही समाजसेवी संस्था कॅन्सर पीडितांसाठी मदत म्हणून दानपेटी घेऊन उभे होते. तेथील प्रत्येक जण जणू परमेश्वराचे कार्य म्हणून कार्य करत होते. व्यावसायिक तीन चाकाच्या सायकलीने भाविक भक्तांना वाहून नेण्याचे कार्य करत होते. मुख्य रस्त्याच्या पश्चिम दिशेला अक्षयवटवृक्ष व हनुमानजी चे भव्य मंदिर आहे. तेथे सर्व भाविक दर्शन घेतात. श्रीरामचंद्र प्रभू चे पुरातन मंदिर नागा साधू, किन्नर यांचे आखाडे,इस्कॉन मंदिर,नाग वासुकी मंदिर येथे रुद्राक्षाचे ज्योतिर्लिंग आहे, बालाजी मंदिर, चंद्रोदय मंदिर व त्याचबरोबर उत्तर प्रदेशची झाकी म्हणजे कला हे सर्व सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा म्हणून जतन केलेले आहे.या मनमोहक स्थळांनी मन वेधून घेतलं.हे सर्व दृश्य इतके जिवंत,सुंदर व मनमोहक वाटत होते की, बघून छाती गर्वाने फुलून येत होती. अभिमान वाटत होता की, आपण सनातन धर्माचे निर्वाहक आहोत व एकच काय असे अनेक जन्म हिंदू धर्मात जन्माला यावं अशी इच्छा व्यक्त केली व परमेश्वराला पार्थना केली.

दिव्य महाकुंभमेळ्यातील वैशिष्ट म्हणजे नागा साधू व आखाडे.नागा हा शब्द संस्कृत मधून आला आहे. नागा म्हणजे पर्वत अर्थात पर्वतावर राहणाऱ्या लोकांना नागा असे म्हणतात. येथे नागा म्हणजे नग्न नव्हे. जगभरातील सर्वात मोठा हा धार्मिक उत्साह म्हणून महाकुंभमेळ्याचे वैशिष्ट्य आहे. अनंत अनादीकाळापासून महाकुंभ मेळा भारतीय संस्कृती जोपसणारा एक मूल्य भाग आहे. महाकुंभमेळा हा केवळ मेळावा नसून तो आत्मसाक्षात्कार आहे. मनशांती आणि अध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणारा सोहळा आहे.महाकुंभमेळा हा विविध जाती,पंथ, आणि विविध क्षेत्रातील लोकांना एकत्र आणतो. म्हणजे हा हा पवित्र महोत्सव जाती-पातीच्या भेदभावापासून मुक्त आहे. सामाजिक ऐक्य व सांस्कृतिक देवाणघेवाण यातून दिसून येते.महाकुंभमेळ्यामुळे स्थानिक पर्यटनाला चालना मिळते. उन्नत सुविधा व पायाभूत विकासास अनेक वर्ष वृद्धीला प्रोत्साहन मिळते. युनोस्को ने कुंभमेळ्याला मानवतेचा अमृत सांस्कृतिक वारसा म्हणून मान्यता दिली आहे.

महाकुंभमेळ्यातील प्रमुख आकर्षण म्हणजे तेथील पुला खालील भागात रंगवण्यात आलेली ऋषींचे चित्र,पांटून (लोखंडी पूल)विशेष सुविधा नियुक्त तंबू,टेन्ट सिटी, प्रशिक्षित घोड्यावरून गस्त घालणारे उत्तर प्रदेशचे पोलीस कर्मचारी,रात्री दिसणारे मनोहरी दृश्य, रंगरंगोटी, २५ सेक्टरची निर्मिती, स्वच्छता आणि पाण्याची व्यवस्था, हरवलेल्या व्यक्तींसाठी दहा शोध केंद्र, विश्व कल्याण कल्याणासाठी बसलेले तपस्वी साधू, अन्नदान सेवा,असे अनेक आकर्षक आहे की, जे डोळ्याचे पार पारणे फेडतात.

अशाप्रकारे हा अभूतपूर्व सोहळा आई वडील व परमेश्वराच्या कृपेनें डोळ्याने बघण्याचे भाग्य लाभले. हा सर्व अभूतपूर्व दिव्य सोहळा हृदयाच्या कोपऱ्यात आठवणीच्या रूपाने कायमच स्थित राहील.१४४ वर्षांनी येणारे हे महा कुंभपर्व व त्रिवेणी संगम स्नान या जन्मी साधेल या अतिव श्रद्धेने प्रयागराज गेलो आणि मनोभावे तेथील पवित्र स्थानांचे दर्शन व प्रार्थना करून पूर्ण समाधानाने व आनंदाने घरी परतलो.भारतातील विविधतेने नटलेल्या परंपरेचा, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचा व या अभूतपूर्व दिव्य महाकुंभपर्वाचा सदैव गर्व आहे व राहील.


**या अभूतपूर्व महाकुंभमेळ्यातील अमृत स्नानाच्या दिवसांव्यतिरिक्त इतर दिवशी कधीही गेलात तरी ही दिव्य-यात्रा सफलच होईल. म्हणून या पवित्र स्थळाला अवश्य भेट द्या. हर हर गंगे...!**


**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**


## अवैद्य वाळु वाहतुक करणा-या तीन ट्रॅक्टरवर कारवाई

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, भोकरदन (जालना) :** संकष्टी चतुर्थी निमित्ताने पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांमार्फत माहीती मिळताच , हसनाबाद भागातील बोरगाव तारु येथील गिरजानदी पात्रात काही इसम ट्रॅक्टर मध्ये विनापरवाना रॉयल्टीशिवाय वाळु भरुन चोरटी विक्री करण्यासाठी घेवुन जात आहे अशी माहीती मिळाल्याने मौजे बोरगाव तारु येथील गिरजा नदी पात्रात अचानक गेलो असता सदर ठिकाणी गिरजा नदीपात्रातुन इसम नामे १) हरिदास भागाजी धसाळ २) कृष्णा गणेश धसाळ ३) अंकुश गणेश धसाळ सर्व रा. बोरगाव तारु असे इसम त्यांचे ट्रॅक्टर मध्ये कुठलाही परवाना नसतांना वाळु भरुन तिची चोरटी विक्री करण्यासाठी घेवुन जात असतांना मिळुन आले त्यांचे ताब्यातुन तीन ट्रॅक्टर ट्रॉलीसह किंमत अंदाजे २२,६५,००० रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तीनही ट्रॅक्टर पोलीस चौकीला आणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सदरची कारवाई ही मा. अजय कुम ार बंन्सल पोलीस अधीक्षक सो, मा. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक सो, मा.डॉ. गणपत दराडे उपविभागीय पोलीस अधिकारी सो, यांचे म ार्गदर्शनाखाली संजय आहिरे सहायक पोलीस निरीक्षक, पोहेकॉ/१२५५ देवकर, पोकॉ/२२३ सोनुने पोकॉ/३५ बोर्ड, पोकॉ/१५९२ पाटीलपाईक, पोकॉ/१६६९ भिवसने, होमगार्ड १२२९ तरमाले, होमगार्ड १९८ ठोंबरे यांनी केली आहे.

अक्षराज
४ | बुलडाणा, सोमवार, दि.१७ फेब्रुवारी २०२५ | संमिश्र

# सुपे औद्योगिक क्षेत्रात ५०० कोटींची गुंतवणूक १२०० जणांना रोजगार मिळणार

हे शांततेचे प्रतिक ! सुपा एमआयडीसी हे शांततेचे प्रतिक आहे. त्यामुळे अनेक कंपन्या या औद्योगिक क्षेत्रात येण्यास तयार असून ते आपल्या संपर्कात आहेत. सुपा औद्योगिक क्षेत्राची बदनामी करणे हा काही लोकांचा धंदा आहे. त्यांनी आपल्याकडे काय चालले आहे, हे आगोदर पहावे. त्यानंतर इतरांवर चिखलफेक करावी.

**- निलेश लंके, खासदार**

टॉरेल इंडियासाठी निर्णायक क्षण ! ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक टॉरेल इंडियासाठी एक निर्णायक क्षण आहे,कारण आम्ही प्रगत उत्पादनात नवीन उंची गाठत आहोत. सुपा प्रकल्पाचा विस्तार केवळ क्षमता वाढविण्यासाठी नाही तर उद्योगांचे विकेंद्रीकरण, टियर २ आणि टियर ३ क्षेत्रांना सक्षम बनविणे आणि १ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून योगदान देण्याबद्दल आहे.

**- भरत गिते, एमडी व सीईओ, टॉरेल इंडिया**



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** टॉरल इंडिया या आघाडीच्या एकात्मिक ॲल्युमिनियम फाउंड्रीने अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील सुपा (ता. पारनेर) औद्योगिक वसाहतीमध्ये ५०० कोटींची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. या उद्योगामुळे सुमारे १२०० जणांना रोजगार उपलब्ध होणार असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.

'टॉरल इंडिया'ने उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत सांमजस्य करार केला आहे. पुण्यातील टॉरल इंडियाची सध्याची ३ लाख चौ. फुट सुविधा उत्पादन डिझाईनपासून ते गुणवत्ता चाचणी, रंगकाम, असेंब्ली, आणि वितरणापर्यंत व्यापक ॲल्युमिनियम सॅंड-कास्टिंग सोल्यूशन प्रदान करते.

**चारपाट मोठी सुविधा असणार !**

उर्जा संरक्षण एरोस्पेस, सागरी, रेल्वे आणि आरोग्य सेवा यासारख्या क्षेत्रातील वाढती मागणी पुर्ण करण्यासाठी विस्तारित सुपा येथील सुविधा चारपट मोठी असेल. या गुंतवणूकीसह टॉरेल इंडियाचे उद्दीष्ट नवोपक्रमांना चालना देणे, स्थानिक प्रतिभेला सक्षम करणे आणि महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि आर्थिक महत्वकांक्षेत योगदान देताना महत्त्वाच्या उद्योगांमध्ये देशाचे स्वावलंबन वाढलणे आहे.

# भीमराव प्रधान महाविद्यालय शहापूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१६, शहापूर (ठाणे) :** दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी शहापूर येथील भीमराव प्रधान महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, डॉ. भगवान प्रधान महिला महाविद्यालय यांचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा व बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.



या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी माननीय अजय कुमार इंडियन बँक मॅनेजर स्वप्निल भोईर नगरसेवक कळंबे बोरशेती ग्रामपंचायत, सुमेध जाधव, स्वप्निल प्रधान, सुनंदा प्रधान उपस्थित होते सुरुवातीला विद्यार्थ्यांनी विविध कला गुणदर्शन करून आपले नृत्य सादर केले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले डान्स सादर केले त्यानंतर वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या. या स्पर्धेचे बक्षीस वितरण स्वप्निल भोईर, सुमेध जाधव, स्वप्निल प्रधान, प्रधान मॅडम प्रा. देविदास नवसे यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

त्यानंतर डॉ. भगवान प्रधान महिला महाविद्यालयाच्या वतीने फॅशन शो चे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन अतिशय आगळावेगळा फॅशन शो घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उज्वला राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. देविदास नवसे यांनी केले प्रा. पंडित कोचेवाड प्रा. दिपाली गायकवाड यांनी बक्षीस वितरण समारंभाचे नियोजन केले तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे संस्कृती दलाल मयुरी जाधव हर्षला महाळुंगे यांनी केले.

न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चे अहवाल वाचन नीलू कशीव प्राचार्य न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज यांनी केले तर या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधा भानुशाली आणि भारती राजूरकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. ललिता खंबायत यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी महेंद्र भोईर किरण दांडकर आकाश सोनवणे प्रतीक वाघेरे सत्येंद्र बारी दीपिका थोरात शिंगोळे ज्योती मंडले विशाखा शेलार यांनी सक्रिय सहभाग घेऊन नियोजन केले.

# बालसंस्कार शिबीराचा जिल्ह्याला मिळाला नवीन 'म्हावशी पॅटर्न'

**अक्षराज : दशरथ राऊत**

**दि.१६, खंडाळा :** मुलांचा शालेय वयातच प्राथमिक सर्वांगीण शिक्षणाचा पाया मजबूत व्हावा, त्यांचे मन संस्कारक्षम व्हावे आणि भारताचा सुसंस्कारीत नागरिक घडावा या उद्देशाने खंडाळा तालुक्यातील म्हावशी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेने विद्यार्थ्यांसाठी निवासी विशेष बालसंस्कार शिबीर आयोजित केले होते.

या शिबीरामुळे मुलांमध्ये झालेला अमुलाग्र बदल हा त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला. या छोट्याशा शाळेने केलेल्या या भव्य उपक्रमाची सातारा जिल्हयात चर्चा झाली. हा उपक्रम जिल्ह्याला दिशादर्शक ठरला असून बालसंस्कार शिबीराचा नवीन 'म्हावशी पॅटर्न ' जिल्हयाला मिळाला आहे.

म्हावशी ता. खंडाळा येथील प्राथमिक शाळेने शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने या वर्षीचा शैक्षणिक उपक्रम म्हणून विशेष बालसंस्कार शिबीर निवासी स्वरूपात घेतले. यामध्ये पहिली ते चौथी पर्यंतचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले. तीन दिवसांच्या या शिबीरात सकाळी सात ते रात्री दहा वाजेपर्यंत विविध उपक्रम राबविण्यात आले. विशेषतः योग, व्यायाम, श्लोक, प्रार्थना, वेगवेगळ्या कार्यशाळा, बौद्धीक व्याख्याने, कथाकथन, लेखक आमच्या भेटीला, पारंपारीक खेळ, आधुनिक खेळ, संस्कारवर्ग, संस्कारदीप, मातापिता पाद्यपूजन, ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन व संतुलन, परसबाग निर्मिती, सीड बॉल निर्मिती, आकाश निरिक्षण, आरोग्य जागृती, स्वावलंबी शिक्षण, चित्रकला मार्गदर्शन यासह विविध उपक्रम घेण्यात आले. या शिबीरात मुख्याध्यापिका नलिनी मांढरे यांनी व्यायाम व प्रार्थना घेतल्या. केशव कोदे यांचे 'सुसंगती सदा घडो ' या विषयावर व्याख्यान झाले तर जगन्नाथ गार्डे यांनी सुंदर कथाकथन केले. तसेच ज्येष्ठ साहित्यिक विलास वरे यांनी लेखक होण्याचा प्रवास उलगडला. योग प्रशिक्षक स्वप्ना माळी, संदीप ननावरे, पूनम राऊत यांनी मुलांमध्ये संस्कारांची मूल्ये रुजवली.




सत्यवान माळी, सचिन राऊत, दत्तात्रय धायगुडे, बबन जाधव यांनी खेळाची प्रात्यक्षिके दाखविली. चित्रकार उमेश पवार यांनी चित्र रेखांकनाचे धडे दिले. तसेच प्रशांत गंधाले यांनी शेकोटी कार्यक्रमात मुलांच्या सुप्त गुणांना वाव दिला.

या शिबीराचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी गजानन आडे, केंद्रप्रमुख सुनिता साबळे यांच्या हस्ते झाले तर समारोप गटविकास अधिकारी अनिल वाघमारे यांच्या हस्ते संपन्न झाला. सर्व शिबीरार्थींचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# 'छावा'चा बॉक्स ऑफिसवर जलवा !

'छावा' चित्रपट १४ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला आला आणि या सिनेमाने प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर अपेक्षेप्रमाणे अधिराज्य गाजवलेलं आहे. विकी कौशल, रश्मिका मंदाना, अक्षय खन्ना यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'छावा' सिनेमाला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. पहाटेचे शो देखील हाऊसफुल्ल झाले आहेत. प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रेमाबद्दल विकीने देखील पोस्ट शेअर करत कृतज्ञता व्यक्त केली आहे. आता या सिनेमाने पहिल्या दोन दिवसांत म्हणजेच १४ आणि १५ फेब्रुवारीला किती कमाई केली जाणून घेऊयात

'छावा' सिनेमाने पहिल्याच दिवशी ३३.१ कोटींची कमाई केल्याची अधिकृत माहिती 'मॅडडॉक फिल्म्स'ने पोस्ट शेअर करत दिली आहे. 'व्हॅलेंटाईन डे'ला या सिनेमाला चांगला प्रतिसाद मिळाला. लोकांनी चित्रपटगृहांमध्ये जाऊन व्हॅलेंटाईन डे ऐवजी यंदा 'छावा दिवस' साजरा केल्याचं पाहायला मिळालं. यामुळे १४ फेब्रुवारीला सर्वाधिक कमाई करणारा 'छावा' हा पहिला सिनेमा ठरला आहे. यापूर्वी रणवीर-आलियाच्या 'गल्ली बॉय'ने व्हॅलेंटाइन्सला १९.४० कोटी कमावले होते. हा रेकॉर्ड 'छावा'ने मोडला आहे. शनिवारी सिनेमाला आणखी प्रतिसाद मिळणार याचा अंदाज आधीच चित्रपट समीक्षकांनी व्यक्त केला होता. शनिवारी 'छावा'ने तब्बल ३९.३ कोटी कमावले आहेत. यामुळे सिनेमाचं एकूण कलेक्शन ७२.४ कोटींच्या घरात गेलं आहे. त्यामुळे लवकरच 'छावा' १०० कोटींच्या क्लबमध्ये एन्ट्री घेईल.

विकीसाठी 'छावा' हा त्याच्या आजवरच्या सिनेमांपैकी सर्वात मोठी ओपनिंग करणारा सिनेमा ठरला आहे. यापूर्वी त्याच्या 'उरी' सिनेमाने अशाप्रकारे दमदार कमाई केली होती. तसेच 'छावा' चित्रपटाने अक्षय कुमारच्या 'स्काय फोर्स'ला देखील मागे टाकलं आहे, 'स्काय फोर्स'ने गेल्या महिन्यात पहिल्या दिवशी १५.३० कोटी रुपये कमावले होते. आता 'छावा'ने हा रेकॉर्ड सुद्धा मोडला आहे.



दरम्यान, 'छावा'बद्दल सांगायचं झालं तर, विकीने सिनेमात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली आहे. तर, रश्मिका मंदाना यामध्ये महाराणी येसूबाईंची भूमिका साकारत आहे. याशिवाय अक्षय खन्ना, दिव्या दत्ता, आशुतोष राणा, संतोष जुवेकर, विनीत सिंह अशी तगडी स्टारकास्ट आपल्याला सिनेमात पाहायला मिळत आहे.

## थोडक्यात

### १०० दिवस कृती आराखड्याची नमुंमपा मध्ये प्रभावी अंमलबजावणी

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.१५, नवी मुंबई :** नागरिकांना शासन, प्रशासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा गुणवत्तापूर्ण व जलद असाव्यात यादृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी नवी मुंबई महानगरपालिकेतील सर्व विभागांनी जलद करावी अशा प्रकारच्या महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व विभागांनी प्रत्यक्ष कृती करण्यास सुरूवात केली आहे. दररोज नियमित कार्यालयीन कामकाजात व्यस्त रहावे लागत असल्याने सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालयात येऊन अधिकारी, कर्मचारी हे कृती आराखड्याची अंमलबजावणी करीत असून त्यानुसार कार्यालयीन स्वच्छता व कार्यालयातील कागदपत्रे व नस्त्या यांची अभिलेख नियमानुसार विगतवारी करून त्याचे सहा गठ्ठे पध्दती नुसार नियोजन करण्यावर भर देण्यात येत आहे.

या अनुषंगाने आपापल्या विभागातील जुन्या व निरुपयोगी साहित्याची विहीत कार्यपध्दतीने विल्हेवाट लावणे, कार्यालय व परिसर स्वच्छ करणे तसेच अभिलेखविषयक प्रचलित नियम, कार्यपध्दतीप्रमाणे कागदपत्रांचे व नस्तींचे निंदणीकरण करणे, त्याचे अ,ब,क,ड पध्दतीने वर्गीकरण करणे, ड वर्गातील कालावधी पूर्ण झालेली कागदपत्रे नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया करणे तसेच वर्गीकरण झालेले दप्तर अभिलेख कक्षात जमा करणे अशा विविध प्रकारे सर्व विभागांत कार्यवाही करण्यात येत आहे. प्रशासकीय कामकाजात सुनियोजितता असावी व कार्यालयांमधील कागदपत्रे व नस्ती यांचा अभिलेख शासन नियमानुसार योग्य प्रकारे जतन व्हावा याकरिता आयुक्त महोदयांच्या संकल्पनेतून रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांच्या विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचेही अधिकारी, कर्मचारीवृंदासाठी आयोजन करण्यात आले होते. अशा प्रकारे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील १०० दिवसांच्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून विविध विभागांनी केलेल्या कार्यवाहीची पाहणी केली जाणार आहे.


### आंजर्ला खाडीत गाळ उपशाला सुरुवात

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.१६, दापोली (रत्नागिरी) :** हर्णे बंदरातील मच्छीमारी नौकांसाठी वादळी वाऱ्यात आश्रय स्थान असलेली आंजर्ला खाडीतील गाळ उपशाला अखेर सुरुवात झाली असून मे अखेर मोठ्या प्रमाणात गाळ उपसा झाला. तर यंदा पावसाळी मोसमात नौका खाडीत आणताना होणारी दमछाक कमी होण्याची शक्यता मच्छिमार व्यक्त करत आहेत. दापोली तालुक्यातील आंजर्ले खाडीत एकेकाळी मोठी गलबते येत असत. मेंगलोरवरून घराची कौले घेऊन येथे मोठी गलबते आलेली आहेत. कौलांचे मोठे व्यापारी म्हणून येथील आंजर्ले पंचक्रोशीत डायाभाई नावाचे व्यापारी प्रसिद्ध होते. तर अशाच मोठ्या गलबतातून येथील हापूस मुंबई ला पाठविला जात होता. मात्र सध्या हीच आंजर्ला खाडी गाळाने पूर्ण भरली असून छोट्या होड्या सुद्धा खाडीत आणताना कुशल मच्छिमारांची दमछाक होत आहे.हर्णेतील मच्छिमार पावसाळी बंदी कालावधीत आंजर्ले खाडीतच आपल्या नौका शाकारतात. वादळी वातावरणात तर सुरक्षित आणि जवळचे ठिकाण म्हणून आंजर्ले खाडीतच बोटी आणल्या जातात.मात्र खाडी पात्र पूर्ण अरुंद झाले असल्यामुळे भरतीच्या वेळेपर्यंत बोटी आत आणण्यासाठी थांबावे लागते.नैसर्गिक आपत्तीवेळी मात्र तातडीने नौका खाडीत आणणे गरजेचे असते. अशावेळी मच्छीमारांना जीव धोक्यात घालून नौका सुरक्षित आणाव्याच लागतात.अशाच प्रसंगी खाडीत दोन नौकाना जलसमाधी मिळाल्याच्या घटना ही ताज्या आहेत. या पार्श्वभूमीवर गेल्या अनेक वर्षांच्या खाडीतील गाळ उपशाच्या मागणीला अधिक जोर आला होता.दरम्यान नामदार योगेश कदम यांनी मच्छीमारांच्या गाळ उपशाच्या प्रस्तावाला ग्रीन सिग्नल मिळण्यासाठी प्रयत्न केले.त्यानुसार आंजर्ले खाडी पात्र कायम खोल राहण्यासाठी आंजर्ले खाडी किनारी ग्रोयान्स पद्धतीचा बंधारा आणि खाडीतील गाळ उपशासाठी आर्थिक मंजुरी मिळाली असून वर्षभरापूर्वी बंधाऱ्याचे काम सुरू झाले. त्यानंतर आता दोन दिवसापासून खाडीत ड्रेझर दाखल झाला असून खाडीतील गाळ उपशाला सुरुवात झालेली दिसत आहे. त्यामुळे मच्छीमारांनी समाधान व्यक्त केले असून हा गाळ उपसा लवकर पूर्ण झाला तर यंदाच्या पावसाळी मोसमात नौका आणताना होणारा धोका बराच कमी होण्याची शक्यता व्यक्त करत आहेत. त्यामुळे येथील मच्छिमार या गाळ उपशाच्या प्रगतीकडे लक्ष लावून बसलेले दिसत आहेत.

### अग्निशमन दलाने केली अडकलेल्या पक्षाची सुखरूप सुटका

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.१६, विंचूर (नाशिक) :** पक्षी मित्र म्हणजे पक्षांच्या संवर्धनाबद्दल आपुलकी पक्षी हे आपल्या पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. आणि त्यांच्या संवर्धनासाठी काम करणे ही आपली आवश्यकता आहे. काही पक्ष्यांना शेतकऱ्यांचे मित्र मानले जाते, परंतु काही पक्षांच्या प्रजाती नामशेष होत चाललेले आहेत. नाशिक येथील आज पंचवटी भागात, जाणता राजा कॉलनीतील किरण नवले यांच्या फ्लॅटवर रोज एक कबुतराची जोडी वास्तव्यास असते. परंतु या कबुतराच्या जोडीतील एक पक्षी इलेक्ट्रिकच्या खांबावरती असलेल्या पतंगीच्या मांज्याच्या दोऱ्यात अडकला. विशेष म्हणजे त्या पक्षाचा जोडीदार अकलेल्या पक्षा जवळ सारखा घिरट्या घालत होता.

या सोसायटी जवळील पक्षी मित्राने अग्निशमन दलाला कळवल्यानंतर, काही वेळातच पथक आले, आणि अती उंच असलेल्या खांबावर अडकलेल्या पक्षाची सुटका करण्यासाठी या पथकाने स्वतःच्या जीवाची बाजी लावून, या पक्षाची सुखरूप सुटका केली. आणि त्याच्यावर उपचार करून, पाणी पाजून त्याला पुरववत सोडून दिले.

यावेळी अग्निशमन दल, केंद्रप्रमुख, पंचवटी संजय कानडे, फायरमन बाळासाहेब लहानगे, वाहन चालक प्रकाश मोहिते, ट्रेनि फायरमन गणेश रकीबे, संकेत वैष्णव, सिद्धांत गोतीस, प्रथमेश गवळे या अग्निशमन दलाच्या पथकाने पक्षाची सुखरूप सुटका केली. जानताराजा कॉलनीतील नागरिकांनी या अग्निशमन पथकाचे कौतुक केले.